आकाशवाणी नागपूर,
प्रादेशिक बातम्या (मराठी–वेळ सायंकाळी ०६.००)
मंगळवार, दिनांक ०२ एप्रिल २०२४

ठळक बातम्या

1. राज्यात लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची १० एप्रिल रोजी रामटेक इथं जाहीर सभा.

2. लोकसभा निवडणुकीच्या पहिल्या टप्प्यातील प्रचाराला तर दुसऱ्या टप्प्यातील नामांकन प्रक्रियेला वेग.

3. संविधान वाचविण्यासाठी सर्वांनी एकत्र यायला हवं - वर्ध्यात महाविकास आघाडीच्या जाहीर सभेला शरद पवार यांचं संबोधन.

4. माहिती आणि प्रसारण मंत्रालयाच्या डॉक फिल्म बाजारसाठी प्रवेशिका दाखल करण्याची मुदत 10 एप्रिल 2024 पर्यंत.

*****

नरेंद्र मोदी-आगामी रामटेक सभा

राज्यात लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची दहा एप्रिल रोजी रामटेक इथं जाहीर सभा होणार आहे. त्यानंतर १४ एप्रिल रोजी दीक्षाभूमी नागपूर इथं, दर्शन घेऊन चंद्रपूरला देखील ते सभा घेणार आहेत. त्याचप्रमाणे भारतीय जनता पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष, जे.पी.नड्डा, केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांच्या देखील सभा होणार असल्याची माहिती, भाजपचे नेते आणि विधानपरिषदेतील गटनेते आमदार प्रवीण दरेकर यांनी आज मुंबईत, भाजप कार्यालयात आयोजित पत्रकार परिषदेत दिली.

डॉ. अभय पाटील

वैद्यकीय क्षेत्रात कार्यरत असलेले, डॉ.अभय पाटील यांना, काँग्रेसनं अकोला लोकसभेची उमेदवारी घोषित केली असून, त्यामुळं अकोला लोकसभा निवडणूक रिंगणात तिरंगी लढत निश्चित झाली आहे. वंचितला महाविकास आघाडीत समाविष्ट करण्याच्या सर्वच पातळीवरील चर्चा निष्फळ ठरल्यामुळं, काँग्रेसनं अकोल्यातून डॉ.अभय पाटील यांची उमेदवारी जाहीर केली. महायुतीचे अनुप धोत्रे आणि वंचित बहुजन आघाडीचे अध्यक्ष, ॲड.प्रकाश आंबेडकर यांच्यात आता तिरंगी लढत निश्चित असली तरी, खासदार असदुद्दीन ओवेसी यांनी यापूर्वीच, अकोल्यातून उमेदवार देणार असल्याचे स्पष्ट संकेत दिले होते. ओवेसी यांचा, एम.आय.एम. पक्ष कोणता उमेदवार देतो याकडे सर्वांचं लक्ष लागलं आहे.

## लोकसंवाद यात्रा

केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांची लोकसंवाद यात्रा नागपुरात सुरू असून त्यांच्या यात्रेत आज सकाळी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस देखील सहभागी झाले होते. दक्षिण पश्चिम विधानसभा मतदार संघातील अजनी भागातून आज ही लोकसंवाद यात्रा काढण्यात आली. तर, महाविकास आघाडीचे उमेदवार विकास ठाकरे यांनी नागपूर पश्चिम मधून आज प्रचार यात्रा काढली. चंद्रपूर लोकसभा मतदार संघाचे महायुतीचे उमेदवार सुधीर मुनगंटीवार यांनी आज चंद्रपूरमध्ये प्रचारसभा घेतली. आपण देशहितासाठी आणि विकासासाठी निवडणूक लढवत असल्याचं ते यावेळी म्हणाले. दरम्यान, सुधीर मुनगंटीवार यांनी राष्ट्रीय ओबीसी, ए.सी., एस.टी, क्रांतीदलाच्या वतीनं आयोजित ओबीसी, आदिवासी, भटक्या विमुक्त जाती बांधवांच्या मेळाव्यात देखील सहभाग घेतला.

## नामांकन अर्ज

राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष शरद पवार गटाचे वर्धा लोकसभा उमेदवार अमर काळे यांनी महाविकास आघाडीच्या वतीनं आज आपला नामांकन अर्ज दाखल केला. ते या लोकसभेत, राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाच्या, तुतारी या चिन्हावर निवडणूक लढवत आहे. महाविकास आघाडीच्या प्रमुख्य नेत्यांच्या उपस्थित, अमर काळे यांनी अर्ज दाखल केला. तत्पूर्वी स्वाध्याय मंदिर ते जिल्हाधिकारी कार्यालय वर्धापर्यंत त्यांनी, प्रचार रॅलीच्या माध्यमातून, शक्ती प्रदर्शन केलं. रॅलीपूर्वी आयोजित प्रचार सभेला संबोधित करतांना, शरद पवार म्हणाले कि, देशाचं संविधान वाचवायचं असेल तर सर्वांनी एकत्र यायला हवं. देशाच्या राजकारणाची स्थिती अघोषित आणीबाणीकडे वळत असल्याची टीका देखील यावेळी त्यांनी केली. बुलढाण्याचे महायुतीचे अधिकृत उमेदवार खासदार प्रतापराव जाधव यांनी चौथ्यांदा आपला लोकसभेचा उमेदवारी अर्ज आज दाखल केला आहे. अर्ज भरल्यानंतर स्थानिक जयस्तंभ चौकातील गांधी भवन इथून रॅली काढण्यात आली. रॅलीच्या समारोप सभेला पाणीपुरवठा मंत्री पाटील यांच्यासह महायुतीतील नेत्यांनी संबोधित केलं.

## आदित्य ठाकरें

यवतमाळ वाशिमसाठी महाविकास आघाडीकडून संजय देशमुख यांना उमेदवारी जाहीर झाली आहे. आज उमेदवारी अर्ज दाखल करते वेळी झालेल्या महाविकास आघाडीच्या सभेत आदित्य ठाकरेंसह रोहित पवार, काँग्रेस नेते माणिकराव ठाकरे, संतराव पुरके आदी नेते उपस्थित होते. ईडी, सीबीआय, आयटी हे भाजपचे तीन मित्रपक्ष असल्याची टीका शिवसेना उबाठाचे नेते आदित्य ठाकरें यांनी यावेळी केली. दुसरे पक्ष फोडून भाजपनं सरकार बनविलं आहे. हे सरकार इथले उद्योग गुजरातला पाठवित असल्यामुळं महाराष्ट्रातील युवकांना नोकऱ्या मिळत नसल्याचा आरोप त्यांनी केला. या सभेत राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार

गटाचे नेते रोहित पवार यांनी देखील पक्ष सोडून गेलेल्यांवर प्रहार केला. सरकारच्या नीती शेतकऱ्यांच्या विरोधात असल्याचा आरोप त्यांनी यावेळी केला.

बच्चू कडू टीका

भाजपनं नवनीत राणा यांना, अमरावतीमधून लोकसभेची उमेदवारी जाहीर केली आहे. मात्र त्यांच्या उमेदवारीला महायुतीत असलेले बच्चू कडू यांनी विरोध केला आहे. बच्चू कडू यांनी नवनीत राणा यांच्या विरोधात प्रहार पक्षाकडून दिनेश बुब यांची उमेदवारी जाहीर केली. त्यामुळं इथल्या राजकीय वातावरण तापलं आहे. दरम्यान, काही दिवसांपूर्वी नवनीत राणा दाम्पत्यानं मेळघाटमध्ये, आदिवासी महिलांना साड्या वाटल्या होत्या. त्यावरून बच्चू कडू यांची राणा दाम्पत्यांवर टीका केली आहे.

डॉक फिल्म बाजार

माहिती आणि प्रसारण मंत्रालयानं १८व्या मुंबई आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवा सोबत आयोजित केलेल्या पहिल्या-वहिल्या डॉक फिल्म बाजारसाठी प्रवेशिका दाखल करण्याची मुदत वाढवल्याची घोषणा केली आहे. देशाच्या भौगोलिकदृष्ट्या दुर्गम भागात काम करणाऱ्या चित्रपट निर्मात्यांना, प्रवेशिका सादर करणे सुलभ व्हावं यासाठी, पूर्वी जाहीर करण्यात आलेली अंतिम तारीख, ३१ मार्च २०२४ ऐवजी आता, १० एप्रिल २०२४ पर्यंत वाढविण्यात आली आहे. हा बाजार १६ ते १८ जून २०२४ या कालावधीत, मुंबईत आयोजित केला जाणार आहे. चित्रपट निर्मिती आणि चित्रपट वितरण यात, प्रतिभेचं दर्शन घडवणाऱ्या माहितीपट, लघुपट आणि **ॲ**निमेशन सामग्रीला प्रोत्साहन आणि सहाय्य करण्यासाठी, स्थापित केलेलं पहिलं सर्वसमावेशक व्यासपीठ बनण हे डॉक फिल्म बाजाराचं उद्दिष्ट आहे.

विशेष निरीक्षकांची नियुक्ती

आगामी लोकसभा आणि विधानसभा निवडणुकीतील टीकात्मक प्रतिक्रिया आणि इतर हालचालींवर लक्ष ठेवण्यासाठी निवडणूक आयोगानं सहा राज्यांमध्ये विशेष निरीक्षकांची नियुक्ती केली आहे. सात कोटींहून अधिक लोकसंख्या असलेल्या या राज्यांमध्ये, पश्चिम बंगाल, उत्तर प्रदेश, महाराष्ट्र, बिहार, आंध्र प्रदेश आणि ओडिशा यांचा समावेश आहे. आंध्र प्रदेश आणि ओडिशामध्ये एकाच वेळी, विधानसभा निवडणुका होणार आहेत. हे निरीक्षक, विशेषत: सीमावर्ती भागात गैरप्रकार रोखण्यावर भर देतील. आंध्र प्रदेश, कर्नाटक, तामिळनाडू, उत्तर प्रदेश आणि ओडिशामध्ये पैश्यांच्या बळावर निवडणूक लढवण्यापासून रोखण्यासाठी, निवडणूक आयोगानं विशेष वित्त निरीक्षकांचीही नियुक्ती केली आहे.

<u>मतदार जागृतीसाठी बाईक रॅली</u>

'वाढवू तिरंग्याची शान, करू देशासाठी मतदान', 'जागरूक मतदार, बळकट लोकशाही' अशा विविध फलक आणि घोषणांनी, मतदार जागृतीसाठी आज काढण्यात आलेल्या मोटरसायकल रॅलीला, अकोलेकरांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. निवडणूक निर्णय अधिकारी तथा जिल्हाधिकारी अजित कुंभार यांच्यासह, अनेक मान्यवर या रॅलीत सहभागी झाले होते. मतदानाच्या टक्केवारीत वाढ करण्यासाठी, लोकशाही समृद्ध आणि बळकट करण्याकरिता, निवडणूक आयोगातर्फे विविध उपक्रम राबविले जात आहेत. जिल्हा निवडणूक अधिका-यांच्या संकल्पनेतून, 'स्वीप'अंतर्गत 'रॅली फॉर डेमोक्रसी' ही मोटरसायकल रॅली देखील, आज काढण्यात आली.

<u>अमरनाथ यात्रा</u>

यंदाची अमरनाथ यात्रा यशस्वी करण्यासाठी प्रशासनाच्या पूर्वतयारीच्या कामांचा जम्मू-कश्मीर इथं मुख्य सचिव अटल दुल्लू यांनी काल आढावा घेतला. यासंदर्भात आयोजित बैठकीत वरिष्ठ पोलिस अधिकारी, आपत्ती व्यवस्थापन विभाग, हवामान विभागासह अन्य विभागांचे प्रमुख तसंच श्रीअमरनाथजी श्राइन मंडळाचे प्रतिनिधी आणि नागरिक सहभागी झाल्याचं आमच्या वार्ताहरानं सांगितलं. सर्वोच्च न्यायालयाच्या निर्देशांनुसार, मुख्य सचिवांनी, यात्रेकरुंसाठी तंबू, तसंच लंगरसाठी सुरक्षित स्थळं निश्चित करण्याच्या सूचना यावेळी दिल्या. तर यात्रेकरुंसाठी अनेक, नि:शुल्क सेवांसह हवामान विभाग, आरोग्य विभाग, जलशक्ती विभाग तसंच परिवहन विभागाच्या सुविधांचाही त्यांनी आढावा घेतला.

<u>सिलेंडर स्फोट</u>

अमरावती जिल्ह्यातील वरुडच्या भवानी चौक परिसरात आज पहाटे चार वाजताच्या सुमारास दोन सिलेंडरच्या भीषण स्फोटात दोन जण ठार झाले असून, एक जण गंभीर जखमी झाल्याची घटना घडली. घटनेची माहिती मिळताच पोलीस तत्काळ घटनास्थळावर दाखल झाले. जखमी व्यक्तीवर नागपूरच्या मेडिकल हॉस्पिटलमध्ये उपचार सुरू आहे.

<u>एनएसएसचे आयोजन</u>

तीव्र उन्हाचा तडाखा मनुष्यासह पशुपक्षी यांना देखील सहन करावा लागत आहे. त्यामुळं राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या परिसरात, पक्षांसाठी जलपात्र लावण्यात आली आहेत. पक्षांना उन्हाळयात पिण्यासाठी पाणी मिळावं म्हणून विद्यापीठाच्या भौतिकशास्त्र विभागातील, राष्ट्रीय सेवा योजनेच्या वतीनं जलपात्र लावण्याचा कार्यक्रम

करण्यात आला. जमनालाल बजाज प्रशासकीय भवन परिसरात तसंच, भौतिकशास्त्र विभागासह विविध ठिकाणी जलपात्र ठेवण्यात आली आहे.

<u>हवामान</u>

येत्या चोवीस तासात विदर्भासह राज्यात, सर्वत्र हवामान कोरडं राहील, असा अंदाज, हवामान विभागानं व्यक्त केला आहे. विदर्भात सर्वाधिक तापमान, वाशिम इथं ४१ पूर्णांक दोन अंश सेल्सियस इतक्या कमाल तापमानाची नोंद झाली तर नागपुरात आज ४० पूर्णांक सहा अंश सेल्सियस इतक्या कमाल तापमानाची नोंद करण्यात आली.

<u>आधार प्रमाणीकरण</u>

राज्यातल्या सुमारे दोन कोटी बारा लाख शालेय विद्यार्थ्यांना विविध योजनांचा लाभ देण्यासाठी आवश्यक असलेल्या आधार प्रमाणीकरणासाठी, तीस मार्च ही अंतिम मुदत देण्यात आली होती. प्रत्यक्षात एक कोटी ९४ लाखांपेक्षा अधिक विद्यार्थ्यांचे आधार वैध ठरले आहे. तर पाच लाख १७ हजार २३२ विद्यार्थ्यांनी, अद्याप आधार क्रमांकच शिक्षण विभागाला उपलब्ध करून दिलेला नाही. त्यामुळं नव्या सत्रातील गणवेशासह, शालेय पोषण आहाराच्या निधीला कात्री लागून, लाखो विद्यार्थ्यांना या दोन्ही लाभांपासून वंचित राहावं लागण्याची शक्यता आहे. याची गंभीर दखल घेत, विधानपरिषदेच्या उपसभापती, डॉ.नीलम गोऱ्हे यांनी राज्यातील शालेय विद्यार्थ्यांना गणवेश योजनेपासून वंचित ठेऊ नये असे निर्देश, शिक्षण विभागाला दिले आहेत.

*****